त्याचप्रमाणे आपल्या कर्मचाऱ्यांना पुरेशी व सुयोग्य सुरक्षा उपकरणे पुरवणे यासाठी क्षेत्रीय पातळीवर योग्य ती कार्यवाही झाली पाहिजे. मात्र याउलट जर कर्मचारी सुरक्षा साधनांचा वापर करीत नसतील तर त्यांना त्यासाठी प्रवृत्त करणे हेदेखील स्थानिक सुरक्षितता विभागाचे काम आहे. अशा प्रबोधनासाठी स्थानिक पातळीवर कर्मचारी संघटनांना सहभागी करून घेतल्यास त्याचे निश्चितच विधायक परिणाम दिसून येतील.

वीजनिर्मिती केंद्राचा व्याप अवाढव्य स्वरूपाचा असल्याने तिथे अनेक ठिकाणी अपरिहार्यपणे कंत्राटी कामगारांकडून कामे करून घ्यावी लागतात. कोळसा हाताळणी, राख हाताळणी विभाग किंवा अनेक स्थापत्य कामांसाठी जिथे तंत्रकुशल कर्मचाऱ्यांची आवश्यकता नाही अशाच अवजड वा तत्सम कामांसाठी अकुशल कंत्राटी मनुष्यबळ वापरले जाते. अशा कंत्राटी कामगारांच्या काही समस्या असतात. त्या अनेकदा लहान सहान स्वरूपाच्या असतात. संबंधित कंत्राटदारामार्फत त्या सकारात्मक दृष्टीने वेळीच सोडवण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयातील कल्याण अधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला पाहिजे. किमान मजुरीकायदा (मिनिमम वेज-ॲक्ट) चे पालन प्रत्येक कंत्राटदार करत आहे की नाही ही बाब तपासणे जरूरीचे आहे. कंत्राटी कामगारांची पिळवणूक होत असल्यास त्यातून अशा कामगारांमध्ये असहकाराची वृत्ती निर्माण होऊ शकते. हा विषय थेट महानिर्मितीच्या अखत्यारीतील नसला तरीही यावर आपले नियंत्रण मिळविणे व ते राखणे गरजेचे आहे. कारण अशा लहानसहान समस्या प्रसंगी उग्र स्वरुप धारण करतात. अशावेळेस परिस्थिती आपल्या हाताबाहेर जाणार नाही यासाठी स्थानिक पातळीवर पुरेसे प्रयत्न होणे आवश्यक असते. निव्वळ मुख्यालयाकडे अंगुलीनिर्देश करून क्षेत्रीय अधिकाऱ्यांना आपली जबाबदारी यापुढे झटकता येणार नाही. क्षेत्रीय पातळीवर सौहार्दाचे वातावरण असणे फार महत्वाचे आहे. अनेक प्रश्न वेळीच क्षेत्रीय पातळीवरही सोडवता येतात, फक्त त्यासाठी तशी सकारात्मक मानसिकता हवी इतकेच. असे प्रश्न क्षेत्रीय पातळीवर वेळीच सोडविण्यासाठी स्थानिक व्यवस्थापनाने पुरेसे प्रयत्न केले आहेत की नाही हे कृतीतून सिध्द व्हावयास हवे.

गतवर्षी पावसाळ्यात ओल्या कोळशाच्या समस्येने महानिर्मितीला त्रस्त केले होते. पावसाळ्यास अद्याप अवकाश असला तरीही आत्तापासूनच याबाबतीत आपल्याशी निगडीत शक्य ती प्रतिबंधक उपाययोजना आखणे गरजेचे आहे. उपलब्ध कोळशाचा साठा चांगल्यात चांगल्या प्रकारे कसा राखता येईल याचा विचार व्हावा. रिजेक्ट कोलचे प्रमाण कमी करणे, कोळसावहनातील तूट आणखी कमी करणे या गोष्टी आपल्या दृष्टीने फार महत्वपूर्ण आहेत, कारण आपल्या कंपनीची अर्थव्यवस्था प्रामुख्याने इंधन उपलब्धतेशीच निगडीत आहे.

नुकतीच मी आपल्या खापरखेडा प्रकल्पास भेट दिली. आपल्या सर्व निर्धारित प्रकल्पांना नियोजित वेळापत्रकाआधी किंवा किमान विहित मुदतीत पूर्ण करणे ही आपली सर्वोच्च प्राधान्यता आहे. यासाठी मुख्य संयंत्रे पुरवणाऱ्या बी.एच.ई.एल. तसेच अन्य संबंधित पुरवठादारांशी, कंत्राटदारांशी सातत्याने व प्रभावी समन्वय राखणे आवश्यक आहे. प्रकल्प व्यवस्थापनाने अधिक सजग राहून हे उद्दिष्ट्य साध्य करावे असे आवाहन मी करतो.

गेल्या महिन्यातील मनोगतात मी सध्याच्या परिस्थितीत आपल्यापुढे कोणती आव्हाने आहेत याची जाणीव आपल्या सर्वांना करून दिली होती. आगामी काळातील लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका लक्षात घेता कायदा-सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने अखंड वीजनिर्मितीचे योगदान महत्वपूर्ण असणार आहे, ही गोष्ट सर्वांनी लक्षात घ्यावी.

सुब्रत रथो
व्यवस्थापकीय संचालक